श्री. हिरालाल जाधव, अधीक्षक (निलंबित), ठाणे मध्यवर्ती कारागृह याच्या मुळ अर्ज क्र. ९१९/२०१६ मधील न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजु न्यायालयात मांडण्याकरीता विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. श्री.मकरंद लोणकर यांनी केलेल्या खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरी देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायप्रमॅट-०९१६/१५७६/प्र.क्र.३५१ (भाग-१)/तुरुंग-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
दुसरा मजला, मंत्रालय-४०० ०३२
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१७

वाचा: शासन पत्र, विधी व न्याय विभाग क्र. १०३४-२०१६/E, दि.२५.१०.२०१६

प्रस्तावना :

श्री.हिरालाल जाधव, अधीक्षक(निलंबित), ठाणे मध्यवर्ती कारागृह यांच्या मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.९१९/२०१६ या न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी ॲड. श्री.मकरंद लोणकर यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दि.२५.१०.२०१६ च्या पत्रान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी खालीलप्रमाणे न्यायालयीन खर्च केलेला आहे.

sr.No	Particulars	Amount in
	AFFIDAVIT-IN-REPLIES	
1.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 27.10.2016.	5,000/-
2.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 26.10.2016.	5,000/-
3.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 27.10.2016.	5,000/-
4.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 26.10.2016.	5,000/-
5.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 26.10.2016.	5,000/-
6.	Affidavit in-Reply on behalf of Respondent No. dated 27.10.2016.	5,000/-
7.	Copy of affidavit in-Reply of Respondent No. dated 26.10.2016.	5,000/-

	EFFECTIVE HEARINGS	
8.	07.11.2016 effective hearing	50,000/-
9.	21.11.2016 effective hearing	50,000/-
10.	05.12.2016 effective hearing	50,000/-
11.	17.01.2017 effective hearing	50,000/-
12.	24.01.2017 effective hearing	50,000/-
13.	01.03.2017 effective hearing	50,000/-
14.	07.04.2017, Part Heard	50,000/-
15.	18.04.2017, Part Heard	50,000/-
16.	03.05.2017, Part Heard	50,000/-
17.	05.06.2017, Part Heard	50,000/-
18.	09.06.2017, Part Heard	50,000/-
19.	14.06.2017, Part Heard	50,000/-
20.	16.06.2017, Part Heard	50,000/-
21.	21.06.2017, Part Heard	50,000/-
22.	27.06.2017, Part Heard	50,000/-
23.	14.07.2017, Part Heard	50,000/-
24.	24.07.2017, Part Heard	50,000/-
25.	08.08.2017, Part Heard	50,000/-
C.	**CONFERENCE FEES**	Not Charged
	TOTAL (NINE LACS THIRTY FIVE THOUSAND ONLY)	Rs.- 9,35,000-/

सदरच्या प्रकरणी वकिलांना फी स्वरुपात केलेला खर्च रु.९,३५,०००/- (रु. नऊ लाख पस्तीस हजार मात्र) इतक्या न्यायायलीन खर्चास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

उपरोक्त प्रस्तावनेस अनुसरुन, श्री. हिरालाल जाधव, अधीक्षक(निलंबित), ठाणे मध्यवर्ती कारागृह यांच्या मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्र.९१९/२०१६ या न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी ॲड. श्री.मकरंद लोणकर यांनी केलेल्या रु.९,३५,०००/- (रू. नऊ लाख पस्तीस हजार फक्त) इतक्या न्यायालयीन खर्चास प्रतिपुर्ती करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या क्र. अर्थसं-२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३ च्या शासन परिपत्रकान्वये खर्चासाठी तरतूद उपलब्ध असेल व खर्च मंजुरीचे विभागास वित्तीय अधिकार असल्यास परत निधी वितरणास वित्त विभागाची सहमतीची आवश्यकता नसल्याने त्यात्या विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधित प्रकरणाच्या पर्यवेक्षिय अधिका-यांकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच,

प्रस्तुत प्रकरणी ॲड. श्री. मकरंद लोणकर यांना अपरिणामकारक सुनावणी फी व अन्य कोणतेही फी वां भत्ते अनुज्ञेय असणार नाही.

४. यासाठी येणारा खर्च अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, पुणे या कार्यालयाच्या मागणी क्र. बी-५, मुख्य लेखाशिर्ष २०५६ तुरुंग (००१) संचालन व प्रशासन (००)(०१) कारागृह निरीक्षणालय (२०५६००२६) (२८) व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. उपरोक्त प्रमाणे ॲड. श्री. मकरंद लोणकर यांना न्यायालयीन खर्चाची प्रतिपुर्ती करण्याबाबतची कार्यवाही अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११५१००९५५१०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Saguna G Thengil

Digitally signed by Saguna G Thengil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d46fe3bd37ed57f0bdb52fb3a029adc135025943cb93cc90de6ceb564ced5ea3, cn=Saguna G Thengil
Date: 2017.11.15 10:15:01 +05'30'

(स. ग. ठेंगिल)
कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई
३) महालेखापाल,महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य,मुंबई
४) ॲङ श्री.मकरंद लोणकर (द्वारा :- अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे)
५) निवड नस्ती कार्यासन तुरुंग-१